## -: प्रेसनोट दिनांक - ०२/११/२०२३ :-

**आरोपी लोकसेवक १) शेखर अरूण पाटील, वय - २६ वर्षे, पद - मुकादम तथा लपीक, कोल्हापूर महानगरपालीका घरफाळा विभाग क.३, राजारामपूरी कार्यालय, वर्ग -३, रा.मंगळवार पेठ, शाहु बॅकेजवळ, माने गल्ली, कोल्हापूर, २) रोहित विनायक जाधव, वय - ३२ वर्षे, पद - मुकादम तथा लपीक, कोल्हापूर महानगरपालीका घरफाळा विभाग क.३, राजारामपूरी कार्यालय, वर्ग -३, रा.मंगळवार पेठ, तस्ती गल्ली, मारूती मंदिराजवळ, कोल्हापूर यांनी लाच मागणी करून स्विकारलेबाबत........**

---

तक्रारदार यांनी घर खरेदी केले आहे. सदर खरेदी केलेल्या घराची मालकी हक्काची नोंद तक्रारदार यांचे नावे करण्यासाठी त्यांनी राजारामपुरी येथे असलेल्या कोल्हापूर महानगरपालिकेच्या घरफाळा विभागीय कार्यालय ०३ येथे दिनांक १३/०४/२०२२ रोजी अर्ज केला होता. तक्रारदार यांनी केले अर्जाप्रमाणे त्यांनी खरेदी केलेल्या घराची मालकी हक्काची नोंद करणेसाठी कोल्हापूर महानगरपालिकेच्या घरफाळा विभागीय कार्यालय ०३ येथील क्लार्क रोहीत जाधव यांनी तकारदार यांना तुमचे काम घराफाळा विभागातील शेखर पाटील यांचेकडे आहे तुमचे काम पुर्ण करण्यासाठी शेखर पाटील यांना ५०००/- रूपये दया असे सांगितले. त्याप्रमाणे तकारदार क्लार्क शेखर पाटील यांना भेटले असता क्लार्क शेखर पाटील यांनी तकारदार यांचेकडे ३५००/-रूपये दयावे लागतील असे म्हणुन तक्रारदार यांचेकडे लाच मागणी केली.

तक्रारदार यांनी अँन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे दिलेल्या तक्रार अर्जाप्रमाणे पडताळणी केली असता पडताळणीमध्ये आलोसे क. ०१ यांनी तक्रारदार यांनी खरेदी केलेल्या घराची मालकी हक्काची नोंद तक्रारदार यांचे नावे करणेसाठी ५०००/- रूपयांची मागणी करून तडजोडीअंती ३५००/- रूपये दया असे लाच मागणी केली. तसेच आलोसे क. ०२ यांनी तक्रारदार यांना लाच रक्कम आलोसे क. ०१ यांना देणेसाठी प्रोत्साहन दिले.

त्यानंतर सापळा कारवाई आयोजीत केली असता पंच साक्षीदारांचे समक्ष तक्रारदार यांचेकडुन आरोपी लोकसेवक **१) शेखर अरूण पाटील, वय - २६ वर्षे, पद - मुकादम तथा लपीक, कोल्हापूर महानगरपालीका घरफाळा विभाग क.३, राजारामपूरी कार्यालय, वर्ग -३, रा.मंगळवार पेठ, शाहु बॅकेजवळ, माने गल्ली, कोल्हापूर** यांनी तक्रारदार यांचेकडुन ३,५००/- रूपये स्विकारलेने त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले असुन सदर **आरोपी अ.न. ०१ व ०२** यांचेविरूध्द राजारामपूरी पोलीस ठाणे, इचलकरंजी, जि.कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रकीया सुरू आहे.

सदरची कारवाई श्री. अमोल तांबे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, पुणे. श्री. विजय चौधरी, अपर पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, पुणे तसेच श्री सरदार नाळे, पोलीस उप अधीक्षक, यांचे मार्गदर्शनानुसार श्री बापू साळुंके, पोलीस निरीक्षक, पो.हे.कॉ. श्री विकास माने, पो.हे.कॉ. श्री सुनिल घोसाळकर, पो.ना.सचिन पाटील, म.पो.कॉ. पुनम पाटील, अँन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबतच्या तकारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.**

**१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१**
**२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.**
**३) श्री.सरदार नाळे, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९६७३५०६५५५ कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.**
**४) हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४.**
**५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.**